या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः॥

नवरात्रोत्सव
व घटस्थापनेच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २४६। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | रविवार ११/१०/२०२६ । पाने- ६






दंडे गोल्ड & डायमंडस्

## सण नात्यांचा, उत्सव सुवर्णक्षणांचा

सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर **50%** पर्यंत सूट | हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर **100%** पर्यंत सूट

11 ऑक्टोबर ते 15 नोव्हेंबर | हॉलमार्क दागिने बदलतांना 0% घट

नाशिक रोड 7774084019 | संगमनेर 9156009908 | सिन्नर 8983275498

# रोहित्र बदला, वीजपुरवठा सुरळीत करा

## आ. अमोल खताळ यांचे ऊर्जा राज्यमंत्र्यांना निवेदन



युवावार्ता (प्रतिनधी)

संगमनेर विधानसभा मतदार संघातील वीजपुरवठ्याशी संबंधित असणारे विविध प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यासाठी आमदार अमोल खताळ पाटील यांनी मंत्रालयात ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची भेट घेऊन वीज समस्येबाबत लक्ष वेधले तसेच संगमनेर तालुक्यातील मेंढवन येथील वीज उपकेंद्राचे काम तात्काळ सुरू करावे अशी ही मागणी त्यांनी ऊर्जा राज्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे

संगमनेर तालुक्यातील अनेक गावे व वाड्या-वस्त्यांमध्ये वीज पुरवठा सुरळीत ठेवावा, तसेच वारंवार नादुरुस्त होणारे रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बदलून नवीन रोहित्र बसवावेत, अशा विविध मागण्यांसह शेतीच्या कृषी पंपांचा वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा , वारंवार नादुरुस्त होणारे रोहित्र तसेच नवीन विजेचे रोहित्र उपलब्ध न होणे या अडचणींचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. या विविध समस्यांचा शेतीच्या कामांवर परिणाम होत असल्याने वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदार खताळ यांनी राज्यमंत्री बोर्डीकर यांच्या निदर्शनास आणून दिले.

संगमनेर तालुक्यातील मेंढवन येथे मंजूर असलेल्या वीज उपकेंद्राचे काम लवकरात लवकर सुरू करावे जेणेकरून या परिसरातील गावांचा वीजपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल, अशी मागणीही आमदार अमोल खताळ पाटील यांनी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडे केली. शेतकऱ्यांना वीजेअभावी शेतीच्या कामांत अडथळे येऊ नयेत नागरिकांना नियमित वीजपुरवठा मिळावा, यासाठी संबंधित यंत्रणेने आवश्यक उपाययोजना कराव्यात, यावरही त्यांनी भर दिला. संगमनेर विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील वीजपुरवठ्यात सुधारणा करून शेतकरी व नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करणार असल्याची भूमिका आमदार खताळ यांनी मांडली.

# पानोडी शिवारात चोरट्यांचा धुमाकूळ

## कपाट उचकटून अडीच लाखांची रोकड आणि दोन लाखांचे सोन्याचे दागिने चोरले

युवावार्ता (प्रतिनिधी) -

आश्वी - संगमनेर तालुक्यातील पानोडी शिवारात अज्ञात चोरट्यांनी एका घराला लक्ष्य करत रोख रकमेसह सोन्याचे दागिने असा तब्बल ४ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. गुरुवारी (दि. ८) मध्यरात्री घडलेली ही चोरी शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. घरात घुसून कपाट उचकटत रोकड आणि दागिने चोरून नेल्याच्या या घटनेमुळे पानोडी शिवारासह परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पानोडी (ता. संगमनेर) शिवारातील रहिवासी नवनाथ कारभारी पाबळ यांच्या घरी गुरुवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारला. चोरट्यांनी घराच्या देवघराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर स्वयंपाकघरातील लोखंडी कपाट उचकटून त्यामध्ये ठेवलेली अडीच लाख रुपयांची रोख रक्कम चोरून नेली. याशिवाय तीन तोळ्यांचे गठण, अंगठी, कानातील वेल आणि पोत अशा सुमारे दोन लाख रुपये किमतीच्या



सोन्याच्या दागिन्यांवरही चोरट्यांनी हात साफ केला.

रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने मिळून एकूण साडेचार लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे समोर आले. शुक्रवारी सकाळी चोरीचा प्रकार लक्षात येताच पोलिसांना माहिती देण्यात आली. घराचे कुलूप तोडून आणि कपाट उचकटून चोरट्यांनी केलेल्या या चोरीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांनी शुक्रवारी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच चोरीचा तपास प्रभावीपणे करण्याच्या दृष्टीने पोलिसांना आवश्यक सूचना दिल्या.

याप्रकरणी नवनाथ पाबळ यांच्या फिर्यादीवरून आश्वी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून, चोरीचा छडा लावून चोरट्यांना जेरबंद करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# अहिल्यानगरसह पाच जिल्ह्यांत माहिती अधिकार सप्ताह!

अहिल्यानगर - माहिती अधिकार अधिनियम, २००५ ची प्रभावी अंमलबजावणी व्हावी आणि शासकीय कार्यालयांमध्ये पारदर्शकता वाढावी, यासाठी माहिती अधिकार नागरिक समूहाचे जिल्हाध्यक्ष दीपक पाचपुते यांनी केलेल्या तक्रारी व पाठपुराव्याच्या अनुषंगाने नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. विभागीय आयुक्त कार्यालयातील अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) अरविंद लोखंडे यांनी ६ ऑक्टोबर २०२६ रोजी जावक क्रमांक : साशा-७/२०२६/मा.अ.स./ए-३६९१७२२ अन्वये अहिल्यानगर, नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार या पाच जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून ५ ते १२ ऑक्टोबर हा कालावधी 'माहिती अधिकार सप्ताह' म्हणून प्रभावीपणे साजरा करण्याचे निर्देश दिले आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या २९ सप्टेंबर २०२६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने दिलेल्या या निर्देशांनुसार, सर्व अधीनस्थ कार्यालये व सार्वजनिक प्राधिकरणांना माहिती अधिकार कायद्याची जनजागृती करण्यासाठी सूचना द्याव्यात. तसेच कलम ४ अंतर्गत स्वयंप्रेरणेने प्रसिद्ध करावयाची माहिती विशेष मोहीम राबवून अद्ययावत करावी आणि जास्तीत जास्त प्रसिद्ध करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला डॉ. जयश्रीताई थोरात यांचा पाठिंबा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- पुण्यात एमपीएससीच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी भेट देऊन आंदोलकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्यांना पाठिंबा देत, तुम्ही देत असलेला लढा तुमच्या उज्वल भविष्यासाठी आहे. स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा, महाराष्ट्राला पुढे नेण्याची ताकद तुमच्यातच आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच या प्रकरणात दोषींवर जबाबदारी निश्चित करून त्यांनी राजीनामा द्यावा, अशी ठाम भूमिका मांडताना समाजातील व आयोगामधील ब्लड कॅन्सर ठीक करायचा असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पुणे येथे एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन आता चळवळ बनले असून, गेल्या नऊ दिवसांपासून विश्वजित कदम, रोहित पवार, युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्यासह अनेक जण विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी प्रयत्नशील आहेत. या आंदोलनाला डॉ.जयश्रीताई थोरात यांनी भेट देऊन पाठिंबा दिला. यावेळी संगमनेर मधील ५० युवक कार्यकर्ते त्यांच्या समवेत होते. यावेळी बोलताना डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाले की, आंदोलनादरम्यान गुन्हे दाखल झाले, तरी घाबरू नका; ते आपल्यासाठी मेडल आहे असे समजा. या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या विद्यार्थिनींचे कौतुक करताना त्यांनी त्यांच्या संघर्षाला सलाम केला. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना मुलींना अनेक सामाजिक आणि कौटुंबिक आव्हानांना सामोरे जावे लागते.



तर छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांना संघर्षाची प्रेरणा दिली. संत, शाहू, फुले आणि आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हीच परंपरा आहे. विद्यार्थ्यांनी एकजूट कायम ठेवून आपल्या न्याय्य मागण्यांसाठी लढा सुरू ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले.

मा महसूल व शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांचाही या आंदोलनाला पाठिंबा असल्याचे डॉ.जयश्रीताई थोरात यांनी स्पष्ट केले. आपल्याला समाजातला आणि आयोगातला ब्लड कॅन्सर बरा करायचा आहे, असे स्पष्ट विधान करत त्यांनी परीक्षा व आयोगाच्या व्यवस्थेतील त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांना न्याय देण्याची गरज व्यक्त केली.

# बाजारात युद्ध, संकटात संधी! संकटकाळातच श्रीमंतीचा मार्ग घडतो - आदित्य कडलग

जागतिक युद्धजन्य परिस्थिती, आर्थिक अनिश्चितता आणि शेअर बाजारातील घसरण यामुळे गुंतवणूकदारांच्या मनात भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे. मात्र, अशा काळात घाबरून गुंतवणूक विकण्याऐवजी संयम, शिस्त आणि योग्य आर्थिक नियोजनाच्या आधारे निर्णय घेणे महत्त्वाचे ठरते. बाजारातील प्रत्येक घसरण ही संपत्ती निर्माण करण्याची संधी असू शकते; मात्र त्यासाठी योग्य रणनीती आणि दीर्घकालीन दृष्टिकोन आवश्यक आहे. शेअर बाजारात सातत्याने घसरण होत असताना आपल्या पोर्टफोलिओमध्ये दिसणारा लाल रंग गुंतवणूकदारांच्या मनात अस्वस्थता निर्माण करतो. मेहनतीने कमावलेला पैसा कमी होताना दिसला की अनेक जण घाईघाईने गुंतवणूक विकण्याचा निर्णय घेतात. काही जण तर सुरू असलेली म्युच्युअल फंड एसआयपीदेखील बंद करतात. मात्र बाजारातील अस्थिरतेच्या काळात घेतलेला भावनिक निर्णय भविष्यातील संपत्ती निर्मितीच्या मार्गात अडथळा ठरू शकतो.

सध्या जागतिक पातळीवरील युद्धजन्य परिस्थिती, महागाई, वाढते व्याजदर, इंधन व अन्नधान्याच्या किमती, खतांच्या उपलब्धतेविषयीची चिंता आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता यांचा आर्थिक बाजारांवर परिणाम होत आहे. ऋ्ञ, ऋ्शीीळश्रळूशी, ऋीशश्र आणि ऋळपरपलश या चार 'ऋ' भोवती निर्माण झालेली आव्हाने जागतिक अर्थव्यवस्थेसमोर नवी कसोटी उभी करत आहेत. त्यात कंपन्यांचे तिमाही निकाल आणि भविष्यातील नफ्याबाबतची अनिश्चितता यामुळे भारतीय शेअर बाजारावरही दबाव निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत प्रश्न बाजार किती पडला, हा नसून आपण या परिस्थितीला कसे सामोरे जातो, हा आहे.

**१. पॅनिक सेलिंग टाळा; संयम ठेवा!**

बाजारातील घसरणीदरम्यान पोर्टफोलिओचे मूल्य कमी झाले, तर तो प्रत्यक्षात नोंदवलेला नसलेला, म्हणजेच कागदी तोटा असतो. गुंतवणूक विकल्यावर तोटा प्रत्यक्षात निश्चित होतो. मात्र, केवळ गुंतवणूक न विकल्यामुळे ती पुन्हा नफ्यात येईल, याची हमी नसते. त्यामुळे प्रत्येक गुंतवणुकीची गुणवत्ता, आर्थिक उद्दिष्टे आणि जोखीमक्षमता यांचा विचार करणे आवश्यक आहे. दर्जेदार कंपन्या किंवा योग्य प्रकारे निवडलेल्या म्युच्युअल फंड योजनांमध्ये गुंतवणूक केली असेल आणि ती आपल्या दीर्घकालीन उद्दिष्टांशी सुसंगत असेल, तर केवळ बाजार पडतो आहे म्हणून विक्री करण्याची घाई करू नका. दुसरीकडे, कमकुवत



कंपन्या किंवा चुकीच्या कारणांनी निवडलेल्या योजनांचा आढावा घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. भीतीपोटी विक्री नको आणि केवळ बाजार पडला म्हणून आंधळी खरेदीही नको. निर्णय असावा तो अभ्यासपूर्ण!

**२. 'बाय ऑन डिप्स' - घसरणीत खरेदीची रणनीती-**

बाजारात मोठी घसरण झाल्यानंतर चांगल्या गुंतवणुकीचे मूल्य आकर्षक पातळीवर येऊ शकते. अशा वेळी अतिरिक्त गुंतवणुकीसाठी उपलब्ध असलेली रक्कम टप्प्याटप्प्याने वापरण्याचा विचार करता येतो. एकाच वेळी मोठी रक्कम गुंतवण्याऐवजी ठरवलेल्या नियोजनानुसार वेगवेगळ्या टप्प्यांत गुंतवणूक केल्यास बाजारातील चढ-उतारांचा धोका व्यवस्थापित करण्यास मदत होऊ शकते. उदाहरणार्थ, गुंतवणुकीसाठी राखून ठेवलेल्या रकमेचे काही भाग करून नियोजित अंतराने गुंतवणूक करता येईल. मात्र, बाजार किती खाली जाईल किंवा कोणत्या टप्प्यावर तळ गाठेल, हे निश्चितपणे सांगता येत नाही. त्यामुळे प्रत्येक घसरणीनंतर बाजार लगेच वाढेल, या अपेक्षेने गुंतवणूक करू नये.

**३. लिक्विड फंडातून एसटीपीचा पर्याय -**

ज्यांच्याकडे दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी एकरकमी रक्कम उपलब्ध आहे, ते आपल्या परिस्थितीनुसार लिक्विड फंडातून इक्विटी फंडामध्ये सिस्टिमॅटिक ट्रान्सफर प्लॅन (STP) वापरण्याचा विचार करू शकतात. एसटीपीद्वारे ठरावीक अंतराने एका योजनेतून दुसऱ्या योजनेत रक्कम हस्तांतरित करता येते. यामुळे एकाच वेळी संपूर्ण रक्कम बाजारात गुंतवण्याऐवजी टप्प्याटप्प्याने गुंतवणूक करणे शक्य होते.

मात्र, लिक्विड फंडदेखील पूर्णपणे जोखीममुक्त नसतात. त्याचप्रमाणे एसटीपीमुळे नफा निश्चित होत नाही. योग्य योजना, कालावधी, करपरिणाम आणि जोखीमक्षमता लक्षात घेऊनच हा पर्याय निवडावा.

**४. एसआयपी बंद करू नका; शिस्त कायम ठेवा!**

बाजारात घसरण सुरू झाली की अनेक गुंतवणूकदार एसआयपी बंद करतात. प्रत्यक्षात, बाजार खाली असताना त्याच रकमेच्या एसआयपीमधून तुलनेने अधिक युनिट्स मिळू शकतात. यालाच रुपी कॉस्ट ॲव्हरेजिंग म्हणतात. उदाहरणार्थ, एखाद्या फंडाचा प्रति युनिट भाव कमी झाला, तर ठरावीक रकमेच्या गुंतवणुकीत अधिक युनिट्स मिळू शकतात. बाजारातील चढ-उतारांमध्ये नियमित गुंतवणूक करण्याचा हा एक महत्त्वाचा फायदा आहे. मात्र, रुपी कॉस्ट ॲव्हरेजिंगमुळे तोटा टळतो किंवा नफा निश्चित मिळतो, असे नाही. एसआयपी सुरू ठेवण्याचा निर्णय आपल्या उत्पन्नाची स्थिरता, आर्थिक उद्दिष्टे, आपत्कालीन निधी आणि संबंधित फंडाच्या योग्यतेनुसार घ्यावा. दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी बाजाराचा अंदाज बांधण्यापेक्षा गुंतवणुकीतील शिस्त अधिक महत्त्वाची ठरते.

**५. पोर्टफोलिओचा आढावा घ्या; गुणवत्तेला प्राधान्य द्या! -**

बाजारातील घसरण ही आपल्या पोर्टफोलिओचे मूल्यमापन करण्याची योग्य वेळ असू शकते. केवळ मागील परतावा पाहून निवडलेले फंड, अफवांवर आधारित शेअर्स, कमकुवत आर्थिक स्थिती असलेल्या कंपन्या किंवा आपल्या जोखीमक्षमतेशी विसंगत असलेली गुंतवणूक यांचा आढावा घ्यावा. गुंतवणूक करताना कंपनीचे आर्थिक आरोग्य, कर्जाचे प्रमाण, व्यवस्थापनाची गुणवत्ता, व्यवसायाची भविष्यातील क्षमता आणि बाजारमूल्य यांचा विचार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे म्युच्युअल फंडाच्या बाबतीत गुंतवणुकीचे उद्दिष्ट, पोर्टफोलिओची रचना, खर्च, जोखीम आणि दीर्घकालीन कामगिरीचा अभ्यास करावा.यासाठी आपल्या आर्थिक सल्लागाराशी चर्चा करून पोर्टफोलिओतील आवश्यक बदल करावेत. बाजार पडला आहे म्हणून सर्वच गुंतवणूक चांगली झाली, असे समजू नये; तसेच बाजार पडला म्हणून प्रत्येक गुंतवणूक वाईट ठरते, असेही नाही.

**६. भविष्यातील संधी ओळखा; मात्र क्षेत्रनिवड अभ्यासपूर्ण असू द्या!**

जागतिक परिस्थितीत बदल होत असताना काही क्षेत्रांना दीर्घकालीन मागणीचा फायदा मिळू शकतो. उदाहरणार्थ, संरक्षण क्षेत्रातील वाढती गुंतवणूक, आरोग्यसेवेची गरज, औषधनिर्मिती, पायाभूत सुविधा आणि देशांतर्गत उत्पादन यांसारख्या विषयांचा अभ्यास करता येतो. मात्र, एखाद्या क्षेत्राचे भविष्य चांगले दिसत असले तरी त्या क्षेत्रातील प्रत्येक कंपनी चांगली गुंतवणूक ठरेलच असे नाही. व्यवसायाची गुणवत्ता, शेअरचे मूल्यांकन आणि भविष्यातील अपेक्षा यांचाही विचार आवश्यक आहे. केवळ एखाद्या क्षेत्राची चर्चा सुरू आहे म्हणून त्यामध्ये मोठी गुंतवणूक करण्याऐवजी आपल्या एकूण पोर्टफोलिओमध्ये योग्य विविधीकरण राखणे महत्त्वाचे आहे.

**७. आपत्कालीन निधीला हात लावू नका!**

बाजार मोठ्या प्रमाणात घसरला आहे, म्हणून उपलब्ध असलेली सर्व रोकड शेअर बाजारात गुंतवणे धोकादायक ठरू शकते. अचानक नोकरी जाणे, व्यवसायातील अडचणी, वैद्यकीय खर्च किंवा इतर कौटुंबिक गरजांसाठी आपत्कालीन निधी उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हा निधी सुरक्षितता आणि सहज उपलब्धता लक्षात घेऊन ठेवावा. घरखर्च, कर्जाचे हप्ते, विम्याचे हप्ते किंवा पुढील काही वर्षांत लागणारा पैसा शेअर बाजारातील जोखमीच्या गुंतवणुकीत अडकवू नये. सर्वसाधारणपणे, किमान तीन ते सहा महिन्यांच्या आवश्यक खर्चाइतका आपत्कालीन निधी ठेवण्याचा विचार करता येतो. उत्पन्न अनिश्चित असल्यास किंवा जबाबदाऱ्या अधिक असल्यास अधिक निधीची गरज भासू शकते.

**८. इतिहासातून धडा घ्या; पण भविष्याची हमी समजू नका! -**

इतिहासात अनेक वेळा मोठ्या घसरणीनंतर बाजाराने पुनरागमन केले आहे. मात्र, प्रत्येक घसरणीची कारणे, कालावधी आणि त्यानंतरची सुधारणा वेगवेगळी असते.

**२००८ - जागतिक आर्थिक संकट:** जागतिक आर्थिक मंदीच्या भीतीने बाजारात मोठी घसरण झाली. त्यानंतरच्या काळात बाजाराने पुनरागमन केले.

**२०१५-१६ - बाजारातील अस्थिरता:** जागतिक आर्थिक घडामोडी, चीनमधील आर्थिक चिंता आणि देशांतर्गत घटकांमुळे भारतीय बाजारात चढ-उतार दिसले.

**२०२० - कोरोना महामारी:** लॉकडाऊन आणि जागतिक अनिश्चिततेमुळे बाजारात तीव्र घसरण झाली. त्यानंतरच्या काळात बाजाराने मोठी सुधारणा अनुभवली.

**या उदाहरणांतून एक महत्त्वाचा धडा मिळतो-** अल्पकालीन घसरणीमुळे दीर्घकालीन गुंतवणूकदारांनी आपली उद्दिष्टे विसरू नयेत. मात्र, बाजार पूर्वी सावरला म्हणून यावेळीही त्याच कालावधीत किंवा त्याच प्रमाणात सावरण्याची हमी नसते.

**निष्कर्ष : संकटाला घाबरू नका; आर्थिक शिस्त सोडू नका!**

शेअर बाजारातील घसरण ही गुंतवणूकदारांच्या संयमाची परीक्षा असते. या काळात भावनिक निर्णय, अफवांवर आधारित व्यवहार, घाईघाईने विक्री किंवा कर्ज काढून गुंतवणूक करणे टाळले पाहिजे. आपली आर्थिक उद्दिष्टे स्पष्ट असतील, आपत्कालीन निधी पुरेसा असेल, विम्याचे संरक्षण योग्य असेल आणि गुंतवणूक आपल्या जोखीमक्षमतेनुसार विविधीकृत असेल, तर बाजारातील अस्थिरतेला सामोरे जाणे अधिक सोपे होऊ शकते.

संकटाच्या काळात संपत्ती निर्माण करण्याची संधी असू शकते; परंतु ती प्रत्येकासाठी, प्रत्येक वेळी सारखी असेलच असे नाही. योग्य माहिती, संयम, आर्थिक शिस्त आणि अभ्यासपूर्ण निर्णय हेच दीर्घकालीन संपत्ती निर्मितीचे खरे आधारस्तंभ आहेत.

गुंतवणुकीचे निर्णय आपल्या आर्थिक उद्दिष्टांनुसार, जोखीमक्षमतेनुसार आणि पात्र आर्थिक सल्लागाराच्या मार्गदर्शनाखाली घ्यावेत. म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बाजारातील जोखमींच्या अधीन असते. गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधित योजनेची सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचावीत.

**आदित्य कडलग,**
**म्युच्युअल फंड वितरक,**
**संचालक, कडलग इन्व्हेस्टमेंट, संगमनेर.**
९१४२६६२०००

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०





## नवरात्री नऊ दुर्गा
## देवी शैलपुत्री

शैलपुत्री देवी ही नवदुर्गांमधील पहिली देवी असून,ती पर्वतराज हिमालयाची कन्या आणि देवी पार्वतीचेच एक रुप आहे. देवी सतीचा पुनर्जन्म असलेली शैलीपत्री नवरात्री च्या पहिल्या दिवशी तिची पूजा केली जाते आणि ती मूलाधार नवरात्रीच्या पहिल्या दिवशाी तिची पूजा केली जाते आणि ती मूलाधार चक्राचर किंवा मूळ चक्रची देवी मानली जाते. तिला उमा आणि ती वृषारूढ या नावांनी ही ओळचले जाते. शैलीपुत्री देवीची भारतातील मुख्य मंदिरे वाराणसीतील वरुणा नदीजवळ आणि बारामुल्ला (जम्मू आणि काश्मिर) येथे आहेत.

### शैलपुत्री देवीची ओळख

नाव आणि जन्म :- शैलपुत्री म्हणजे पार्वतीची कन्या तिचे वडील पर्वतराज हिमलय आहेत, तर माता म्हणजे मैना.
आवतारचे महत्व :- ती देवी दुर्गेचा पहिला आवतार असून, नावरात्रीच्या पहिल्या दिवशी तिची पूजा केली जाते.
सतीचा पुनर्जन्म :- शैलीपत्री ही सती देवीचा पुनर्जन्म आहे, असे मानले जाते.
रूप :- ती बैलावर (वृषभ) स्वार असते आणि तिच्या हातात त्रिशूळ आणि गदा असते.
उपासना :- नवरात्रीच्या पहिल्या दिवशी तिची पूजा केल्याने आध्यत्मिक जागृत होते आणि जीवनातील ध्येयाकडे वाटचाल सुरु होत, असे मानले जाते.
शैलीपुत्रीची उपासना
नवरात्रीच्या पहिल्या दिवशी शैलीपुत्री मातेची विशेष पूजा केली जाते.
तिची पूजा केल्याने साधकाच्या मूलाधार चक्रातून शक्तीची जागृती सुरु होते.

# राज्यपालांच्या हस्ते १०३ पोलीस अधिकारी, अंमलदारांना राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान

मुंबई (पराग कुलकर्णी) राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते आज लोकभवन येथे झालेल्या पोलीस अलंकरण सोहळ्यामध्ये १०३ पोलीस अधिकारी व अंमलदारांना राष्ट्रपतींनी जाहीर केलेली पोलीस शौर्य पदक, शौर्य पदक, उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक तसेच गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदक समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले.

अलंकरण सोहळ्यामध्ये सन २०२२ व २०२३ या वर्षांच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त तसेच २०२३ व २०२४ या वर्षांच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जाहीर झालेली पोलीस पदके प्रदान करण्यात आली. यावेळी २ पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस शौर्य पदक, १८ जणांना शौर्य पदक, ३ अधिकाऱ्यांना राष्ट्रपती यांचे उल्लेखनीय सेवेचे पोलीस पदक , ४ अधिकारी व अंमलदारांना राष्ट्रपती यांचे गुणवत्तापूर्ण सेवेचे पदक, ४० अधिकारी व अंमलदारांना पोलीस पदक व ३६ जणांना गुणवत्तापूर्ण सेवेचे पदक प्रदान करण्यात आले. आज झालेल्या अलंकरण सोहळ्यामध्ये मीरा भायंदर वसई विरारचे पोलीस आयुक्त निकेत कौशिक, पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रविण साळुंके, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) मधुकर पाण्डेय, विशेष पोलीस महानिरीक्षक (व्हीआयपी सुरक्षा) प्रविण कुमार पडवळ व विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण व खास पथके) निशिथ मिश्र या अलंकृत अधिकाऱ्यांचा समावेश होता.

अलंकरण सोहळ्याला गृह राज्यमंत्री (ग्रामिण) डॉ पंकज भोयर, अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) मनिषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त पोलीस महासंचालक (एटीएस) नवल बजाज, पोलीस अधिकारी, सन्मानित पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

पोलीस अलंकरण सोहळ्याची सुरुवात राष्ट्रीय गीत, राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तसेच सांगता राष्ट्रीय गीत व राष्ट्रगीताने झाली. अलंकृत करण्यात आलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदारांची यादी सोबत जोडली आहे.

फोटो - पराग कुलकर्णी, मुंबई



# अभीष्टचिंतन...
## प्रेरणादायी व्यक्तिमत्व रत्नाकर पगारे सर



दमदार आवाज, सहानुभूतीचे हास्य आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व यांमुळे वयाच्या सत्याऐंशीव्या वर्षीही रत्नाकर पगारे सर प्रभावशाली वाटतात. शिक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांनी स्काऊटच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना गुणवंत व संस्कारक्षम घडवले.

स्काऊटच्या विद्यार्थ्यांना घेऊन त्यांनी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची भेट घेतली होती. त्या वेळी राष्ट्रपतींनी सरांचा आणि विद्यार्थ्यांचा कौतुकास्पद सन्मान केला. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांसह आनंदवन येथे स्काऊट शिबिर आयोजित केले. या निमित्ताने ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आमटे यांचा सहवासही त्यांना लाभला. सरांच्या मौलिक गुणांमुळे स्काऊट क्षेत्रात राज्यभर त्यांचा नावलौकिक झाला. आजही ते स्वखर्चाने स्काऊटचे कार्यालय चालवत आहेत. त्यांचे माजी विद्यार्थी आवर्जून त्यांना भेटायला येतात.

वयाच्या सत्याऐंशीव्या वर्षीही सर आनंदी आणि उत्साही दिसतात. वृद्धापकाळातील व्याधींना त्यांनी मित्र मानले आहे. किती शस्त्रक्रिया झाल्या आणि किती औषधे घेतात, हे ते खड्या आवाजात हसत सांगतात. त्यामुळे समोरच्याचे दु:ख हलके होते. वाढदिवसानिमित्त केलेल्या भाषणात त्यांनी सुख, आनंद आणि सामाजिक बांधिलकीविषयी मौलिक विचार मांडले. आजच्या तरुण पिढीबाबत त्यांनी खंत व्यक्त केली. सर्वधर्मसमभाव मानणाऱ्या या प्रेरणास्थानाला उदंड आयुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**भाऊसाहेब मांडे,** संचालक
संगम वधू-वर मंडळ, संगमनेर

# पाहणी नको, तातडीने मदत द्या - खा. लंके

युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर -
राज्यभरात पावसाने ओढ दिली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीची दखल घेत नुकतीच केंद्रीय पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणी दौऱ्यानंतर खासदार नीलेश लंके यांनी राज्य आणि केंद्र सरकारकडे शेतकऱ्यांच्या वतीने तातडीच्या मदतीची मागणी केली आहे. केवळ पाहणी करून थांबू नका, तर दसऱ्याच्या आधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट मदत जमा करा, अशी आग्रही भूमिका खासदार लंकेंनी घेतली आहे.

केंद्रीय पथकाने तातडीने जिल्ह्याची पाहणी केल्याबद्दल खासदार निलेश लंके यांनी समाधान व्यक्त केले. मात्र, केवळ दौऱ्यांवरून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत, याची जाणीव त्यांनी सरकारला करून दिली. माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले, सरकारने दुष्काळाच्या पाहणीसाठी एवढी तत्परता दाखवली, त्याबद्दल नक्कीच एक समाधान वाटतं. पण ज्या पद्धतीने आता पाहणी दौरा केला, केवळ तो दौरा करून काहीही साध्य होणार नाही. लोकांना आता तात्काळ मदत दिली गेली पाहिजे, ही आमची सगळ्यात महत्त्वाची भूमिका आहे.ऐन सणासुदीच्या काळात शेतकरी आणि शेतमजूर आर्थिक विवंचनेत सापडले आहेत.

# बी. आर. कदम सर यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)
बहुजन शिक्षण संघाचे अध्यक्ष आणि कालकथित दादासाहेब रुपवते यांचे ज्येष्ठ सहकारी माजी मुख्याध्यापक बी .आर. कदम सर यांनी आज शनिवारी सकाळी आपल्या राहत्या घरी निधन झाले.

स्व. बी. आर. कदम सर यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवून माजी मंत्री दादासाहेब रुपवते यांच्या सोबत बहुजन शिक्षण संघ व शैक्षणिक चळवळीत मोलाचे योगदान दिले. त्यांनी अनेक वर्ष येथील सिध्दार्थ विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून काम केले. त्यानंतर बहुजन शिक्षण संघाचे विश्वस्त म्हणून देखील ते काम पहात होते. येथील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय चळवळीत देखील त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनाने शिक्षणक्षेत्रासह सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांची अंत्ययात्रा सायंकाळी ५ वाजता त्यांच्या विद्यानगर येथील राहत्या घरापासून निघून येथील अमरधाममध्ये त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कालकथित बी.आर.कदम सर यांच्या पश्चात मुले संजय कदम, राजेंद्र कदम, विवेक कदम, मुली प्रज्ञा निकम, विद्या साळवे सुना नातवंडे असा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने स्व. बी. आर. कदम सर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# माजी विद्यार्थ्याकडून हिवरगाव पावसा शाळेला चार संगणक भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)
हिवरगाव पावसा - विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षणाच्या अधिक चांगल्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी डिजिटल शिक्षणात मागे राहू नयेत या उद्देशाने हिवरगाव पावसा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे माजी विद्यार्थी विठ्ठल सयराम पावसे यांनी शाळेला सुमारे ७५ हजार रुपये किमतीचे चार दर्जेदार संगणक संच भेट दिले आहेत. 'मिशन आपुलकी' अंतर्गत त्यांनी दिलेल्या या योगदानामुळे शाळेच्या आयसीटी लॅबला बळ मिळणार असून, त्यांच्या या शैक्षणिक योगदानाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गावातील ज्येष्ठ नागरिक सयराम भिका पावसे उर्फ काकाजी यांचे चिरंजीव विठ्ठल पावसे यांनी आपण ज्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले त्या शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत संगणक संच उपलब्ध करून दिले. विशेष म्हणजे, यापूर्वीही त्यांनी सुमारे एक लाख रुपये किमतीचे पाच संगणक संच शाळेला देणगी म्हणून दिले होते. आता पुन्हा चार संगणकांची भेट देत त्यांनी शाळेच्या शैक्षणिक विकासासाठी आपली बांधिलकी अधोरेखित केली आहे.

शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक आर. पी. राहणे गेल्या वर्षभरापासून ग्रामस्थ, माजी विद्यार्थी आणि लोकसहभागाच्या माध्यमातून शाळेच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी शाळेत आधुनिक वाचनालय, प्रयोगशाळा आणि आयसीटी लॅब विकसित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासोबतच पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यावरही भर दिला जात आहे. शाळेला सुसज्ज इमारत उपलब्ध व्हावी, यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत.

संगमनेर तालुक्याचे गटविकास अधिकारी श्री. शिनारे, गटशिक्षणाधिकारी श्री. गुंड, विस्तार अधिकारी नंदा वलवे, श्री. सदगीर, केंद्रप्रमुख रुपेश वाकचौरे आणि अक्षय खतोडे यांनी या उपक्रमाचे कौतुक करून विठ्ठल पावसे यांचे अभिनंदन केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीण गडाख, उपाध्यक्ष स्वाती दगडू पावसे व सर्व सदस्य, सरपंच सुभाष गडाख, उपसरपंच सुजाता दवंगे, ग्रामविकास अधिकारी हरीश गडाख, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष गणपतराव पावसे, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष शरद पावसे, माजी उपाध्यक्ष सोमनाथ भालेराव, दूध संघाचे संचालक डॉ. प्रमोद पावसे, प्रा. बाबुराव पावसे, काशिनाथ पावसे, गणेश दवंगे, केशव दवंगे, किरण पावसे, रामनाथ पावसे, डॉ. संदीप पावसे, रमेश पावसे, नितीन भालेराव, रामनाथ गडाख, अनिल गडाख, मच्छिंद्र पावसे, आप्पासाहेब गडाख, दिगंबर पावसे, यादवराव पावसे, भीमाशंकर पावसे यांच्यासह ग्रामस्थ, माजी विद्यार्थी आणि शिक्षकांनी या उपक्रमाबद्दल विठ्ठल पावसे यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

# कीड नियंत्रणासाठी जैविक खतांचा वापर वाढवा - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर- कमी पाऊस वातावरणातील बदल यामुळे पिकांवरील किडींचे प्रमाण वाढले आहे. हुमणी अळी, पायरीला, खोडकिड, व विविध कीड यांचा वाढता प्रादुर्भाव कमी करण्याबरोबर जैविक खतांच्या माध्यमातून उत्पादकता वाढीस मदत होत असल्याने शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त जैविक खतांचा वापर करावा असे आवाहन माजी कृषी व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर आयसीएआर, भारतीय ऊस संशोधन संस्था, जैविक नियंत्रण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती उपयोजना कार्यक्रम अंतर्गत ९५ शेतकऱ्यांना जैविक किटचे वितरण करण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी व्हाईस चेअरमन पांडुरंग पा. घुले हे होते. तर व्यासपीठावर शास्त्रज्ञ डॉ. ज्ञानेश्वर बोरसे, डॉ. योगेश थोरात, संचालक संपतराव गोडगे, रामनाथ कुटे, सतीश वर्पे, योगेश भालेराव, दिलीप नागरे, रावसाहेब दुबे, सुंदराबाई दुबे, माणिकराव यादव, कदम सर, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, किरण कानवडे, कृष्णा दिघे, कृषी अधिकारी भाऊसाहेब खर्डे, ऊस विकास अधिकारी बाळासाहेब सोनवणे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा कृषिमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, यावर्षी पाऊस कमी झाला असून संपूर्ण राज्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. वातावरण बदलाचा परिणाम हा कीड वाढीस कारणीभूत ठरतो. हुमनी आळी बरोबर पायरीला खोडकिड, पांढरी माशी या अळींचा प्रादुर्भाव वाढतो आहे. रासायनिक खतांपेक्षा जैविक खतांचा वापर केल्याने जमिनीमध्ये हवा खेळती राहते. खर्च कमी येतो, कीड नियंत्रण करण्यास मदत होते, शेतीमध्ये सेंद्रिय कार्बन वाढवून उत्पादकता वाढते. शेणखत, ताग, याचबरोबर विविध जैविक घटकांमुळे जमिनीमध्ये अधिक सुपीकता वाढून उत्पादन वाढ होण्यास मदत होत असल्याने शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त जैविक खतांचा वापर करावा असे आवाहन त्यांनी केले.

तर डॉ. योगेश थोरात म्हणाले की, कमी पावसामुळे हुमणी अळीचा उपद्रव वाढला आहे. पायरीला कीडही वाढत आहे. कीटक नाशकांमध्ये शेतकरी जास्त खर्च करत असून जैविक खतांच्या माध्यमातून कीटक प्रादुर्भाव रोखण्यास मोठी मदत होत आहे. सातत्याने रासायनिक कीटकनाशकांचा वापर केल्याने किटकांमध्ये सुद्धा रोगप्रतिकार शक्ती वाढून त्यावर फरक पडत नाही म्हणून या बिव्हिरीया, मेटालायझम, ट्रायकोडमा याचबरोबर विविध जैविक औषधांचा वापर केल्याने कीटकांचा प्रादुर्भाव कमी होईल असे ते म्हणाले.

तर डॉ. ज्ञानेश्वर बोरसे म्हणाले की माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली थोरात कारखान्याने शेतकरी व ऊस उत्पादकांना कायम चांगल्या सुविधा दिल्या आहेत. शेतीमधील ऑरगॅनिक कार्बन कमी झाला की उत्पादकता कमी होते म्हणून सेंद्रिय खतांचा वापर करा असे आवाहन त्यांनी केले.

# संगमनेरमध्ये ऑप्टिकल व्यावसायिकांची संघटना स्थापन



युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर शहरातील ऑप्टिकल व्यावसायिकांनी दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी एकत्र येत संगमनेर ऑप्टिकल असोसिएशनची स्थापना केली. ऑप्टिकल व्यावसायिकांना एका व्यासपीठावर आणून त्यांच्यात एकोपा व सहकार्याची भावना निर्माण करणे, व्यवसायाचा विकास साधणे आणि ग्राहकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे, हा या संघटनेच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे. तसेच नवीन तंत्रज्ञान व आधुनिक उपकरणांची माहिती सदस्यांना देणे, ऑप्टिकल व्यवसायाची प्रतिष्ठा आणि व्यावसायिक दर्जा उंचावणे, तसेच व्यवसायातील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कायदेशीर व संघटित पद्धतीने प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या संघटनेच्या अध्यक्षपदी विजय वालाजी कोडूर (प्रभात स्पेक्ट गुरू), उपाध्यक्षपदी नयन दिनेश दासरी (नयन चष्मेवाले), सचिवपदी निशांत विजय खिलारी (सुलोचन आय केअर) आणि खजिनदारपदी प्रमोद परशुराम सातपुते (ज्योती चष्मावाला) यांची निवड करण्यात आली.

या वेळी विजय सातपुते (विजय चष्मा), दिलीप राऊत (साईरत्न चष्माघर), उमेश शुक्ला (योग चष्माघर), अतुल जगताप (विराली आय केअर), संतोष बालोडे (बालोडे चष्माघर), अजित कढणे (कढणे चष्माघर), जयेश मिरजगावकर (दिवेकर ऑप्टिकल), नरेंद्र कोडूर (प्रभात वॉच), अमोल देशमुख (संदेश चष्माघर), आशिष चायल (दृष्टी ऑप्टिकल) आणि धीरज शिंदे (शिंदे चष्माघर) हे ऑप्टिकल व्यावसायिक उपस्थित होते. संघटनेच्या स्थापनेसाठी दिलीप राऊत आणि अजित कढणे यांनी विशेष सहकार्य केले.

## संपादकीय...

# अफवांच्या बाजारात सत्याचा आवाज कसा टिकणार?

आजचे युग माहितीचे आहे. मोबाईलच्या एका स्पर्शावर जगभरातील घडामोडी आपल्या हातात येतात. सोशल मीडिया, व्हॉट्सप, यूट्यूब आणि विविध डिजिटल माध्यमांमुळे माहितीचा प्रसार पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने वेगवान झाला आहे. मात्र, या माहितीच्या महापुरात सत्य किती आणि असत्य किती, हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. एखादी बातमी खरी आहे की खोटी, याची खात्री करण्यापूर्वीच ती हजारो लोकांपर्यंत पोहोचते. काही वेळा एका निराधार संदेशामुळे समाजात भीती निर्माण होते, व्यक्तीची प्रतिष्ठा धोक्यात येते, सामाजिक तेढ वाढते आणि कायदा-सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे आज प्रश्न केवळ अफवा कोण पसरवत आहे, एवढाच नाही; तर अफवांच्या बाजारात सत्याचा आवाज कसा टिकणार, हा आहे. पूर्वी गावातील पारावर, चावडीवर किंवा बाजारपेठेत चर्चेतून अफवा पसरत असत. त्यांचा वेग मर्यादित होता. आज मात्र डिजिटल माध्यमांनी अफवांना अमर्याद वेग दिला आहे. एखाद्या घटनेचा जुना व्हिडिओ नव्या घटनेच्या नावाखाली प्रसारित केला जातो. दुसऱ्या राज्यातील छायाचित्र स्थानिक घटनेशी जोडले जाते. एखाद्या व्यक्तीच्या विधानातील काही शब्द वेगळे काढून त्याचा अर्थ बदलला जातो. कधी बनावट पत्रे, खोटे स्क्रीनशॉट, एडिट केलेले व्हिडिओ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तयार केलेली चित्रे यांचा वापर करून लोकांची दिशाभूल केली जाते. माहिती खरी असल्याचा आभास निर्माण केला जातो; मात्र तिच्यामागील सत्य तपासण्याची तसदी फार कमी जण घेतात. माणसाला धक्कादायक, खळबळजनक आणि भावनिक माहिती पटकन आकर्षित करते. आपल्या विचारांशी जुळणारी बातमी दिसली की तिची सत्यता तपासण्यापेक्षा ती पुढे पाठवण्याची घाई होते. एखादी माहिती आपल्या राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक मतांना पुष्टी देत असेल, तर तिच्यावर सहज विश्वास ठेवला जातो. भीती, राग, द्वेष आणि संशय या भावनांचा वापर अफवा पसरवण्यासाठी केला जातो. म्हणूनच अनेकदा साधी, वस्तुनिष्ठ आणि पुराव्यांवर आधारित माहिती मागे पडते; तर सनसनाटी दावे समाजमाध्यमांवर वेगाने पसरतात. यामध्ये केवळ माहिती तयार करणाऱ्यांचीच जबाबदारी नाही. कोणताही संदेश न तपासता पुढे पाठवणारा प्रत्येक जण नकळत अफवेच्या प्रसाराचा भाग बनू शकतो. 'मला कोणीतरी पाठवले', 'मी फक्त फॉरवर्ड केले' किंवा 'सगळेच शेअर करत आहेत', ही कारणे सामाजिक जबाबदारीतून मुक्त करू शकत नाहीत. कारण एखादी खोटी माहिती पुढे पाठवण्याची कृती छोटी वाटली, तरी तिचे परिणाम गंभीर असू शकतात. खोटी माहिती एखाद्या व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा उद्ध्वस्त करू शकते. आर्थिक फसवणुकीसाठी बनावट गुंतवणूक संदेशांचा वापर होऊ शकतो. आरोग्याविषयीच्या चुकीच्या दाव्यांमुळे लोक चुकीचे निर्णय घेऊ शकतात. जातीय किंवा धार्मिक स्वरूपाच्या अफवांमुळे परस्परांवरील विश्वासाला तडा जाऊ शकतो. एखाद्या गावात चोरी, अपहरण किंवा हिंसाचाराविषयी अप्रमाणित संदेश पसरल्यास निरपराध व्यक्तींवर संशय घेतला जाण्याचा धोका असतो. त्यामुळे अफवा ही केवळ चुकीची माहिती नसून सामाजिक शांतता, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सार्वजनिक विश्वास यांच्यासमोरील आव्हान आहे. अशा परिस्थितीत प्रसारमाध्यमांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. पत्रकारितेचा मूलभूत आधार म्हणजे सत्यशोधन, तथ्यांची पडताळणी आणि जबाबदार सादरीकरण. बातमी सर्वप्रथम देण्याच्या स्पर्धेपेक्षा अचूक बातमी देण्याला प्राधान्य मिळाले पाहिजे. अधिकृत माहिती, प्रत्यक्षदर्शींची साक्ष, संबंधित व्यक्तींची बाजू आणि उपलब्ध पुरावे तपासल्याशिवाय निष्कर्ष काढणे टाळले पाहिजे. चूक झाल्यास ती स्पष्टपणे दुरुस्त करण्याचे धैर्यही माध्यमांनी दाखवले पाहिजे. कारण माध्यमांची विश्वासार्हता केवळ वेगावर नव्हे, तर सत्यनिष्ठेवर उभी असते. याचबरोबर वाचक आणि प्रेक्षकांनीही माहितीचे केवळ ग्राहक न राहता सजग नागरिक बनणे आवश्यक आहे.

# भक्ती आणि शक्तीचा संगम म्हणजे नवरात्रोत्सव

## स्त्रीशक्तीचा जागर करताना जाणीवा व्यापक करा; स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदला



नवरात्रोत्सव म्हणजे केवळ देवीची उपासना नव्हे, तर अंतर्मनातील शक्ती जागृत करून जीवनातील जाणिवा व्यापक करण्याचा उत्सव आहे. भक्ती आणि शक्तीचा सुंदर संगम असलेल्या या उत्सवातून स्त्रीसन्मान, अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य आणि सद्विचारांचा स्वीकार करण्याची प्रेरणा मिळते. हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण उत्सव म्हणून नवरात्रोत्सव साजरा केला जातो. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत चालणाऱ्या या उत्सवात आदिशक्ती जगदंबेची आराधना करून सामर्थ्य, धैर्य आणि सद्बुद्धीची प्रार्थना केली जाते. या काळात घटस्थापनेला विशेष महत्त्व आहे. कलश हा पवित्रता, सकारात्मक ऊर्जा आणि मंगलतेचे प्रतीक मानला जातो.

कलशपूजेतील ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे प्रतीकात्मक महत्त्व समजून घेताना शुद्ध जाणीव, कर्तव्यभावना आणि विचारांची व्यापकता या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. आज स्वार्थी वृत्ती आणि संकुचित विचारांमुळे माणूस मानवी मूल्यांपासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत स्वतःच्या जाणिवा जागृत करणे, कर्तव्याचे भान ठेवणे आणि विचारांची व्याप्ती वाढवणे, हाच नवरात्रोत्सवाचा खरा संदेश आहे. महिषासुराचा वध करण्यासाठी देवीने नऊ दिवस युद्ध करून दहाव्या दिवशी विजय मिळविल्याची कथा अन्याय, अहंकार आणि दुष्ट प्रवृत्तींविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा देते. आजही महिलांवर होणारे अत्याचार, त्यांच्या स्वातंत्र्यावर घातली जाणारी बंधने आणि स्त्रियांकडे पाहण्याचा विकृत दृष्टिकोन ही समाजासमोरील गंभीर आव्हाने आहेत. अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी समाजाने एकत्रितपणे उभे राहिले पाहिजे. महिलांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे धैर्य दाखवले पाहिजे. शाळा-महाविद्यालयांत मुलींना स्वतःच्या सुरक्षिततेविषयी जागरूक केले पाहिजे. त्याचबरोबर मुलांनाही स्त्रीचा आदर करणे, तिच्या स्वातंत्र्याचा सन्मान करणे आणि समानतेची भावना जोपासणे यांचे संस्कार दिले पाहिजेत.

छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आचरणात आणूया!

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्त्रियांच्या सन्मानाला सर्वोच्च स्थान दिले. त्यांचा स्त्रीसन्मानाचा आदर्श केवळ ऐकण्यापुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष आचरणात आणला पाहिजे. माता-भगिनींचा सन्मान राखणे आणि महिलांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्याशिवाय स्त्रीशक्तीचा खरा गौरव होऊ शकत नाही. नवरात्रोत्सव साजरा करण्याचे सार्थक तेव्हाच होईल, जेव्हा आपण स्त्रीचा आदर केवळ देवीच्या रूपात नव्हे, तर दैनंदिन जीवनातही करू.

श्रद्धा महत्त्वाची; कर्मकांड नव्हे!

नवरात्रोत्सवात उपवास करताना महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. शरीराला त्रास होईल इतके कठोर उपवास करण्याची आवश्यकता नाही. भक्तीमध्ये श्रद्धा आणि भाव यांना अधिक महत्त्व आहे. नऊ दिवस नऊ रंगांच्या साड्या नेसण्यासारख्या प्रथा आनंद आणि उत्साह निर्माण करीत असतील, तर त्यांचे स्वागतच आहे; मात्र अशा प्रथा म्हणजेच भक्ती नव्हे. सण-उत्सवांचे स्वरूप केवळ कर्मकांडापुरते मर्यादित न ठेवता त्यामागील विचार समजून घेतला पाहिजे. उत्सवातून आनंद, समाधान, सकारात्मकता आणि सामाजिक एकोपा वाढला पाहिजे. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन हे नवविधा भक्तीचे नऊ प्रकार आहेत. देवीचे महात्म्य ऐकणे, तिचे स्मरण करणे, पूजा-अर्चना करणे, सेवाभाव ठेवणे आणि स्वतःचे सर्वस्व ईश्वराच्या चरणी समर्पित करणे, या माध्यमांतून भक्ती अधिक दृढ होते. या भक्तीतून जीवनाला सकारात्मक दिशा मिळते आणि सद्विचारांची प्रेरणा मिळते. नवरात्रोत्सव हा आपल्या अंतर्मनाचे परीक्षण करून स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचा उत्सव आहे. आपल्या बोथट झालेल्या जाणिवा जागृत करणे, संकुचित विचारांतून बाहेर पडणे, स्त्रीच्या स्वातंत्र्याचा आदर करणे आणि स्वतःतील भोगवादी वृत्तीवर नियंत्रण मिळवणे, हाच या उत्सवाचा खरा अर्थ आहे. आई जगदंबेची उपासना करताना मिळणारी शक्ती समाजहितासाठी आणि सद्विचारांसाठी वापरण्याचा संकल्प करूया. देवीची पूजा करताना स्त्रीचा सन्मान करणे, शक्तीची आराधना करताना अन्यायाविरुद्ध लढणे आणि भक्ती करताना मानवी मूल्यांचे पालन करणे, हाच नवरात्रोत्सवाचा खरा संदेश आहे.

– प्रा. शशांक गंधे

# मोदी सरकार पडणार? राऊतांचा दावा!

मुंबई (वृत्तसंस्था)

देशभरात पेटलेला जनक्षोभ आणि जनतेचे हे उफाळलेले बंड आता दडपणे कोणालाही शक्य नाही. नरेंद्र मोदी आणि त्यांच्या जुलमी सरकारच्या पतनाची उलटी गिनती सुरू झाली आहे. लिहून ठेवा, पुढील सहा महिन्यांत म्हणजेच मार्च ते एप्रिल महिन्यापर्यंत मोदी सरकार आपला शेवटचा श्वास घेईल आणि देशात निवडणुका होईपर्यंत सर्व पक्षांचे मिळून एक पर्यायी 'राष्ट्रीय सरकार' स्थापन होईल, असा खळबळजनक राजकीय दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत संजय राऊत यांनी दिल्लीतील इंडिया आघाडीचे आंदोलन, निवडणूक आयोगाची कथित मनमानी, पोलिसांकडून आंदोलकांची होणारी धरपकड, पुण्यातील एमपीएससी आंदोलन आणि देशातील राजकीय स्थितीवर नेहमीच्या आक्रमक आणि रोखठोक शैलीत चौफेर हल्ला चढवला.

# मौलाना अय्युब नदवी यांना चार सूफी सिलसिल्यांची खिलाफत प्रदान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील मदरसा एजाजुल कुरानचे सदर (प्रमुख) मौलाना अय्युब नदवी यांना मालेगाव येथील हजरत मौलाना मुफ्ती हमीद जफर रहमानी, शेखुल हदीस, महद मिल्लत यांच्या हस्ते चार सूफी सिलसिले - नक्शबंदी, सुहरवर्दी, कादरी आणि चिश्ती - यांची खिलाफत प्रदान करण्यात आली. या धार्मिक सन्मानाबद्दल अंजुमन-ए-इस्लाम ट्रस्टच्या वतीने मौलाना अय्युब नदवी यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी अँग्लो उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन शेख गनी हाजी, अंजुमन-ए-इस्लाम ट्रस्टचे चीफ ट्रस्टी अब्दुल्लाह हाजी हसन चौधरी, सेक्रेटरी हाजी पठाण शौकतखान मोहंमदखान आणि ट्रस्टी हाजी शेख एजाज शमशुद्दीन उपस्थित होते.

सत्कारप्रसंगी अंजुमन-ए-इस्लाम ट्रस्टचे चीफ ट्रस्टी अब्दुल्लाह हाजी हसन चौधरी यांनी मौलाना अय्युब नदवी यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, मदरसा एजाजुल कुरानच्या उभारणीसाठी मौलाना अय्युब नदवी यांनी मेहनत घेतली आहे. अनाथ, गोरगरीब आणि होतकरू मुलांना आधार देऊन त्यांचे पालनपोषण करणे, तसेच त्यांना धार्मिक शिक्षणाबरोबरच शालेय शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अत्यंत प्रशंसनीय आहेत. अँग्लो उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य शेख मुनव्वर खलीलुरहेमान यांनीही मौलाना अय्युब नदवी यांचे कौतुक केले. या सन्मानाबद्दल उपस्थित मान्यवरांनी मौलाना अय्युब नदवी यांचे अभिनंदन करून मदरसा एजाजुल कुरानच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्राचार्य शेख मुनव्वर खलीलुरहेमान, पर्यवेक्षक रहेमानी उबेदुर्रहमान, कलीमुर्रहमान, खान साजिद दिलावर सर, शेख मजहर अय्युब, मनियार सलीम रमजु, पठाण शाहरुख आसिफ, खान शाहरुख आसिफ, सय्यद इरफान माजिद, अंसारी खालीकुर्रहमान, हिफजुर्रहमान सर, खान आसिफ दगडू, खान सलीम अकबर, शेख रिजवान युसुफ आणि शेख इम्रान युसुफ आदी उपस्थित होते.


## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डॉ. हेमंत गोविंद शिंदे रा. साई कॉम्पलेक्स नविन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर म्यु.घ.नं. -, सि. स. नं. १५२/८०४/१३७ स.नं. १५२/१५२; १५२/१५५ या ठिकाणी मध्ये सोनोग्राफी सेंटरचा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. ०९/१०/२०२६ मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट- १
(स्त्री / पुरूष)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

**पाहिजेत**
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७१२७२,९३७०७७३५०४

**पाईल्सचा कायमचा उपाय !**
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

**संगमनेर सहकारी औद्योगीक वसाहत मर्या., संगमनेर**
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर पिन- ४२२६०८
फोन नं. ०२४२५-२५९०२९ Email-ID-Sangam.sav@gmail.com

**पाहिजेत**

आमचे सहकारी औद्यगिक वसाहतीसाठी खालील पदे भरावयाची आहेत.तरी पात्र उमेदवारांनी स्वःहस्ताक्षरातील अर्ज व शैक्षणिक कागदपत्रांच्या सत्यप्रती दि.२३.१०.२०२६ पर्यंत वरील पत्त्यावर पोहचतील अशा रितीने पाठवावेत.

| अ.नं. | पदाचे नांव | संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभवी(सहकारी संख्या) |
|---|---|---|---|---|
| १. | क्लार्क (महिला/पुरुष) | २ | बी.कॉम | २ वर्षापेक्षा जास्त तसेच संगणक व सहकार कायद्याचे ज्ञान आवश्यक |

१. मुलाखतीसाठी येणाऱ्या उमेदवारांना कोणतेही भत्ता दिला जाणार नाही.
२. योग्य व पात्र उमेदवार न मिळाल्यास भरती प्रक्रिया स्थगित/रद्द करण्याचे अधिकार संचालक मंडळास राहील.
३. मुलाखतीमध्ये उमेदवार पात्र वाटल्यास शैक्षणिक अर्हतेमध्ये शिथीलता देण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

श्री.सोमनाथ रामनाथ पाबळकर, व्हा.चेअरमन — श्री.के.के.थोरात, चेअरमन

**शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये रोजगाराची संधी!**
भरती सुरू आहे
कृषी क्षेत्रात काम करण्याची सुवर्णसंधी!
पदाचे नाव:-फिल्ड कॉर्डिनेटर - २
कामाचे स्वरुप:-
शेतकऱ्यांबरोबर समन्वय साधणे,शेतकऱ्यांच्या शेतीविषयक मार्गदर्शन व समन्वय,शेतकरी गट/ सभासदांशी नियमित संपर्क ठेवणे, कंपनीच्या कृषीविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे
शैक्षणिक पात्रता
पद्वीधर/कृषी पदविका/तत्सम शैक्षणिक पात्रता शेती विषयक कामाचा अनुभव असणे गरजेचे
वयोमर्यादा, २५ ते ३५ वर्षे कार्यस्थळ,संगमनेर तालुका
ईच्छुक उमद्वारांनी बायोडाटा पुढील नंबरवर दि. १८/११/२०२६ व्हॉटसअॅप किंवा इमेलवर पाठवावा. संपर्क:9850119046
Email:ens.krishivikasfpc@gmail.com
कृषी क्षेत्रात काम करण्याची आवड आणि शेतकऱ्यांसोबत काम करण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांनी आजच अर्ज करावा!

**पाहिजेत**
ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे
आत्मशांती टी सेंटर
(सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य)
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ अँण्ड सन्स
नेहरुचौक, संगमनेर
9850530266

**पाहिजेत**
डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा
स्वतःची टू व्हीलर लायसन्स आवश्यक
B & K Construction
7758009532
7028456005

**Urgently Required**
Office Manager
Sangamner (1 Post)
Valuation Report Typist, Property Visit. Office Management.
Contact-
9421911671

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा भरणे आहे**
ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरुष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431






# गुंजाळवाडीतील दहाव्याच्या कार्यक्रमात मारहाण झाल्याची घटना असत्य

## सरपंच अमोल गुंजाळ यांचा खुलासा

### कौटुंबिक वादाचा ग्रामपंचायतीशी अथवा गावाशी संबंध नसल्याचे नमूद



युवावार्ता (प्रतिनिधी)

गुंजाळवाडी- गुंजाळवाडी येथे दहाव्याच्या कार्यक्रमादरम्यान मारहाण झाल्याची माहिती चुकीची असून, संबंधित कार्यक्रम शांततेत व विधिवत पार पडला आहे, असा खुलासा सरपंच अमोल गुंजाळ यांनी केला आहे.

गुरुवार दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी कै. दशरथ विष्णू गुंजाळ आणि कै. शिवलाल रामसिंग घाडगे यांच्या दहाव्याच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाला सरपंच म्हणून आपण प्रत्यक्ष उपस्थित होतो, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. या कार्यक्रमात ह. भ. प. सुनीताताई महाराज कातोरे यांचे प्रवचन झाले. त्यानंतर श्रद्धांजली अर्पण करून सामुदायिक पसायदान घेण्यात आले. या कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थ, नातेवाईक आणि पाहुणे मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम नेहमीप्रमाणे शांततेत व विधिवत पार पडला. कार्यक्रमादरम्यान कोणताही गोंधळ अथवा हल्ल्याचा प्रकार घडला नसल्याचे सरपंचांनी स्पष्ट केले.

निवेदनानुसार, घाडगे-सावंत परिवारातील संबंधित प्रकार गुंजाळवाडी येथील अठरा पगड वसाहतीत झाल्याचे सांगण्यात आले असून, तो कौटुंबिक वादातून घडल्याचा दावा करण्यात आला आहे. या घटनेचा ग्रामपंचायत गुंजाळवाडी किंवा गावाशी कोणताही संबंध नसल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच, संबंधित प्रकार गावातील स्मशानभूमीत घडलेला नसल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

घटनेबाबत प्रसारित झालेल्या माहितीमुळे ग्रामपंचायतीच्या कार्याबाबत अथवा गावाच्या प्रतिष्ठेबाबत गैरसमज निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने आपण हा खुलासा करीत असल्याचे सरपंचांनी सांगितले. नागरिकांनी कोणत्याही अपुऱ्या किंवा चुकीच्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढू नयेत, असे आवाहनही त्यांनी केले.

# तुटपुंज्या मानधनामुळे अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांचा संप

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - राज्यातील २३८८ अनुदानित वसतिगृहांमधील ८१०४ कर्मचाऱ्यांनी तुटपुंज्या मानधनामुळे आणि शासनाकडून होत असलेल्या फसवणुकीच्या निषेधार्थ १९ ऑक्टोबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारला आहे. याच काळात विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्र परीक्षा सुरू असल्याने या वसतिगृहांमध्ये राहून शिक्षण घेणाऱ्या सुमारे एक लाख मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांची काळजी घेण्यासाठी अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस आणि चौकीदार असे चार कर्मचारी कार्यरत असतात. त्यांना अनुक्रमे १००००, ८५०० आणि ७५०० रुपये (मदतनीस व चौकीदार प्रत्येकी) इतक्या तुटपुंज्या मानधनावर २४ तास काम करावे लागते. अलीकडेच अनुदानित आश्रमशाळा संलग्न वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना सरकारी

वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. मात्र, पुणे येथील समाजकल्याण आयुक्तांनी या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचा प्रस्ताव सादर करूनही शासनाने तो फेटाळला. तसेच मागील आठवड्यात मंत्रिमंडळात केवळ तुटपुंजी मानधनवाढ मंजूर केली. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने अनेक आंदोलने, मोर्चे आणि उपोषणे करूनही शासनाकडून दखल घेतली जात नसल्याची खंत कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. पगारवाढीच्या प्रतीक्षेत अनेक कर्मचारी निवृत्त झाले असून काहींनी आत्महत्याही केल्या आहेत. आता शासनाचा हा निर्णय सहन न करता कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले आहे. या संपामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची राहील, असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. तसेच सकारात्मक निर्णय होईपर्यंत हा संप मागे घेतला जाणार नाही, असे युनियनचे अध्यक्ष नागसेन पवार यांनी स्पष्ट केले आहे.

# अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणात आरोपीला सक्तमजुरी

युवाावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -: अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी संगमनेर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी रुपेश उर्फ अनिल बुधा सोनवणे (रा. मुरशेत, ता. अकोले) याला दोषी ठरवत तीन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. तसेच विविध कलमांनुसार दंडाची शिक्षा ठोठावत पीडितेला पाच हजार रुपयांची आर्थिक भरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणातील दुसरा आरोपी पंढरी प्रभाकर पगारे (रा. आधारवाडी, ता. इगतपुरी) याची मात्र पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, ६ ऑक्टोबर २०२३ रोजी संध्याकाळच्या सुमारास आरोपी रुपेश सोनवणे याने पीडित अल्पवयीन मुलीला झाडपाल्याचे औषध देण्याच्या बहाण्याने मोटारसायकलवर बसवले. त्यानंतर तिला शिंगणवाडी शिवारातील जंगलात नेऊन तिच्यासोबत गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला आणि तिचा विनयभंग केला. या घटनेनंतर पीडितेने राजूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा रजिस्टर क्रमांक ३४८/२०२३ अन्वये संबंधित कलमांखाली तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

या खटल्याची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश मंदार नेरलेकर यांच्या न्यायालयात झाली. सरकार पक्षाच्या वतीने सहा साक्षीदार तपासण्यात आले. सादर करण्यात आलेले साक्षी-पुरावे आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेतल्यानंतर न्यायालयाने रुपेश उर्फ अनिल बुधा सोनवणे याला दोषी ठरवले.

न्यायालयाने पोक्सो कायद्याच्या कलम ८ अंतर्गत आरोपीला तीन वर्षांचा सक्तमजुरीचा कारावास आणि दोन हजार रुपयांचा दंड सुनावला. दंड न भरल्यास १५ दिवसांचा अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे. तसेच भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ अंतर्गत दोन वर्षे सक्तमजुरी व दोन हजार रुपये दंड, तर कलम ३६६ अंतर्गत दोन वर्षे सक्तमजुरी व एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. याशिवाय पीडितेला पाच हजार रुपयांची आर्थिक भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक फझल शेख यांनी केला. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील मच्छिंद्र गवते यांनी न्यायालयात बाजू मांडली. खटल्याच्या कामकाजात पैरवी कॉन्स्टेबल स्वाती नाईकवाडी यांनी सहकार्य केले.

# शेताच्या बांधावर पोहोचले केंद्रीय पथक

## शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून दुष्काळाच्या झळांची घेतली प्रत्यक्ष अनुभूती



युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर- खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळसदृश परिस्थिती आणि पीक नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्र शासनाचे आंतरमंत्रालयीन पथक शुक्रवारी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. पथकाने शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला, करपलेल्या पिकांची पाहणी केली तसेच पाणीटंचाई आणि शेतीपूरक व्यवसायांवरील संकटाचा आढावा घेतला. पाणी, चारा आणि आर्थिक मदतीबाबत शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या यावेळी मांडल्या.

पथकप्रमुख के. पोन्नुसामी (संचालक, केंद्रीय पीक विभाग) यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्यासह चास, निमगाव वाघा तसेच कर्जत तालुक्यातील टाकळी खंडेश्वरी, चिंचोली काळदात, वालवड आणि रेहेकुरी या गावांना भेटी दिल्या.

करपलेली पिके, कोरड्या तलावांची पाहणी - चास येथे बाजरी, तूर आणि कांदा पिकांच्या नुकसानीची पाहणी करून विठ्ठल गवळी, पोपट गवळी, भिकाजी सहादू देवकर, अनिल देवकर आणि श्रीपती देवकर या शेतकऱ्यांशी पथकाने संवाद साधला. पावसाअभावी पिकांची झालेली हानी, शेतीसाठी केलेला खर्च आणि अपेक्षित उत्पादनात होणारी घट याबाबत माहिती घेण्यात आली.निमगाव वाघा येथील कोरड्या पडलेल्या पाझर तलावाची पाहणी करून जलस्त्रोतांवरील परिणामांचा आढावा घेण्यात आला. कर्जत तालुक्यातील टाकळी खंडेश्वरी येथे बाजरी आणि तूर पिकांच्या नुकसानीची पाहणी करताना पांडुरंग चांडे, सागर ढोबळे, बाळासाहेब सपकाळ, नंदलाल, किरण पाटील आणि आबा काळदाते यांच्याकडून परिस्थितीची माहिती घेण्यात आली.चिंचोली काळदात येथे कोरड्या तलावासह दुष्काळामुळे नुकसान झालेल्या सीताफळ बागेची पाहणी करण्यात आली. यावेळी दादा ढोबे, सरपंच सुधीर फडतरे, राजेंद्र काळदाते, बापूसाहेब काळदाते आणि दत्तात्रय काळदाते यांच्याशी चर्चा झाली. प्रमिला मनोहर लाळगे यांच्या तूर पिकाचीही पाहणी करण्यात आली. पाण्याअभावी फळबागा आणि इतर पिकांचे नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

पोल्ट्री व्यवसायालाही दुष्काळाचा फटका- दुष्काळाचा परिणाम शेतीपुरता मर्यादित राहिला नसून शेतीपूरक व्यवसायांनाही त्याची झळ बसत आहे. पाणीटंचाई आणि वाढत्या अडचणींमुळे पोल्ट्री फार्म बंद पडल्याची माहिती शेतकऱ्यांनी पथकाला दिली. वालवड येथे पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विहिरीची पाहणी करण्यात आली, तर रेहेकुरी शिवारात नारायण सिताराम वाघमोडे यांच्या मका पिकाची प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करण्यात आली.

पाणी, चारा आणि तातडीच्या मदतीची मागणी- पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून पेरणीचा खर्च, अपेक्षित आणि प्रत्यक्ष उत्पादन, जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दूध उत्पादनावरील परिणाम आणि पीक नुकसानीच्या पंचनाम्यांबाबत माहिती घेतली. 'गावाची वाढलेली लोकसंख्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा वाढवावा. जनावरांसाठी चारा उपलब्ध करून द्यावा आणि शासनाच्या मदत उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी,' अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. पिकांचे नुकसान झाल्यानंतर आर्थिक अडचणींना सामोरे जात असताना पाणी आणि चाऱ्याची व्यवस्था करणेही कठीण झाल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक- क्षेत्रीय पाहणीपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात बैठक घेण्यात आली. जिल्ह्यातील पावसाची स्थिती, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि दुष्काळसदृश परिस्थितीबाबत अधिकाऱ्यांनी पथकाला माहिती सादर केली. या दौऱ्यात प्रभारी जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, नगरचे प्रांताधिकारी सुधीर पाटील, कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील, नगर तालुक्याचे तहसीलदार मिलिंद कुलथे आणि कर्जत तालुक्याचे तहसीलदार रवींद्र सतवण यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या पाहणीतून संकलित केलेली माहिती केंद्र शासनाला सादर करण्यात येणाऱ्या अहवालात समाविष्ट केली जाणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पीक नुकसान, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या अडचणींचे वास्तव केंद्र शासनापर्यंत पोहोचणार असून, पुढील मदत उपाययोजनांच्या दृष्टीने या अहवालाला महत्त्व राहणार आहे.

# मनोली शिवारात अवैध वाळू उपशावर पोलिसांचा छापा, २ लाखांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील मनोली शिवारात रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर आश्वी पोलिसांनी धडक कारवाई केली. गुरुवारी (दि. ८) मध्यरात्री करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी दोन लाख रुपये किमतीचे वाहन आणि पाच हजार रुपये किमतीची एक ब्रास वाळू असा एकूण २ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी अजित हांडे आणि वेदांत शिंदे या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मनोली शिवारात रात्रीच्या वेळी बेकायदेशीररीत्या गौण खनिज अर्थात वाळूचा उपसा सुरू असल्याची गोपनीय माहिती आश्वी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर त्यांनी पोलीस पथकाला तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार, पोलीस पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकून अवैध वाळू उपशासाठी वापरले जाणारे सुमारे दोन लाख रुपये किमतीचे वाहन तसेच पाच हजार रुपये किमतीची एक ब्रास वाळू जप्त केली. या कारवाईमुळे मनोली शिवारातील अवैध वाळू उपशाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी नन्हे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अजित हांडे आणि वेदांत शिंदे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल आर. एम. लहामगे करीत आहेत.


नोकरीची सुवर्णसंधी

'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

पदे: Field Sales Executive
Business Development Manager

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



चैतन्य हॉस्पिटल

डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

02425 - 224761, मोबा. 7038170382




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता








कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय् KH

- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर

सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225

४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६


डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist


डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist


दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# दिपकेसह हजारो आंदोलक ताब्यात



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा आणि एसआयआर थांबवण्याच्या मागणीसाठी विरोधकांनी रान उठवले असताना 'कॉकरोच जनता पार्टी'ने आज शनिवारी दिल्लीत जोरदार धडक दिली. त्यात या आंदोलनात डाव्या पक्षांनी सहभाग घेतल्याने लाखोंच्या संख्येने आंदोलन दिल्लीत दाखल झाले. हजारो पोलिसांच्या संरक्षणात आंदोलन घुसू लागल्याने पोलिसांनी प्रचंड बळाचा वापर केला. त्यातच या आंदोलनाची हाक देणाऱ्या सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके, आशुतोष रांका आणि सौरव दास यांना तर दिल्ली विमानतळावर उतरताच ताब्यात घेण्यात आले. तसेच प्रसिद्ध युट्यूबर ध्रुव राठी, महात्मा गांधींजीचे नातू तुषार गांधी, आपचे नेते सिसोदिया आणि महाराष्ट्रातील शेतकरी नेते कॉ. डॉ. अंजीत नवले त्यांच्या सोबत हजारो आंदोलकांना ठिकठिकाणी ताब्यात घेऊन दिल्ली बाहेर सोडण्यात आले तसेच हजारो आंदोलकांना बंदिस्त देखील करण्यात आले.

पोलिसांनी ज्या पद्धतीने बंदोबस्त तैनात केला आहे. तो पहाता दिल्लीच्या जंतरमंतरला युद्धभूमीचे स्वरूप आल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. विरोधकांनी या हुकूमशाहीला अघोषित आणीबाणीची उपमा दिली आहे.

निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात सुरू असलेल्या या आंदोलनाला विविध विरोधी पक्ष आणि डाव्या विचारसरणीच्या संघटनांचा पाठिंबा दिला. त्यामुळे दिल्लीतील आंदोलनाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. आंदोलनकर्त्यांना जंतरमंतरपर्यंत पोहोचण्यापासून रोखण्यासाठी ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. काही आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले, तर काहींना दिल्लीबाहेर सोडण्यात आले.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जंतरमंतर आणि राजधानीतील महत्त्वाच्या ठिकाणी कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार असताना आंदोलकांना रोखले जात असल्याचा आरोप सीजेपीने केला आहे. आपल्या नेत्यांना आंदोलनस्थळी पोहोचण्यापासून रोखणे आणि निदर्शनांचे नेतृत्व करू न देणे, हाच या कारवाईमागील उद्देश असल्याचा दावा पक्षाने केला आहे. दरम्यान, नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दीन रेल्वे स्थानकांशी संबंधित सुमारे २५० मेल आणि एक्स्प्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या. तसेच इंडिया गेटच्या चार किलोमीटर परिसरात शुक्रवार रात्री १० वाजल्यापासून शनिवार रात्री १० वाजेपर्यंत इंटरनेट सेवा बंद ठेवण्यात आले आहे.

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी 'एक्स' या समाजमाध्यमावरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. देशातील परिस्थिती आणीबाणीपेक्षाही गंभीर असल्याचे सांगत त्यांनी सरकारच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विमानातून उतरल्यानंतर नेत्यांना ताब्यात घेण्यात आल्याचा उल्लेख करत, विरोधकांना रोखण्यासाठी सत्ताधारी पक्षाकडून भीतीचे वातावरण निर्माण केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

निवडणुका जिंकण्यासाठी मतांच्या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित होत असल्याचा दावा करत केजरीवाल यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी पुन्हा अधोरेखित केली. त्यांच्या या भूमिकेमुळे निवडणूक आयोगाच्या कामकाजावरून सुरू असलेला राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

॥ जलदान विधी ॥
आपले स्मितहास्य, प्रेमळ स्वभाव आणि मोलांचे मार्गदर्शन सदैव आमच्या स्मरणात राहील...

चांगली माणसे कधीही खरंच जात नाहीत, ते सदैव आपल्या आठवणीत जिवंत असतात...
कालकथित विलास भास्कर दारोळे
यांच्या पवित्र आत्म्यास सद्गती लाभो, हीच प्रार्थना.
यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !
दिनांक : 11/10/2026 (रविवार)
वेळ : सकाळी 10:00 वाजता
स्थळ : मालपणी लॉन्स, संगमनेर

जगात एकंच...
फक्त माझंच
अश्या सर्व महिलांसाठी...
मंगळसूत्र महोत्सव
11 ते 20 ऑक्टोबर 2026
मंगळसूत्राच्या मजुरीवर 25% सूट.
जानकीराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
+91 7588 249 849
पत्ता : राजेंद्र क्लॉथ समोर, मेन रोड संगमनेर, अहिल्यानगर - ४२२६०५.

# ग्रामीण रस्त्यांसाठी ३ कोटी मंजूर - आ. तांबे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भौगोलिक दृष्ट्या विस्ताराने मोठ्या असलेल्या संगमनेर तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विकासाच्या योजना राबवल्या गेल्या आहेत. तालुक्यात रस्त्याचे जाळे निर्माण करण्यात आले असून विविध गावांमधील रस्त्याचे मजबुतीकरण कामांसाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाले असल्याची माहिती आमदार सत्यजित तांबे यांनी दिली आहे.



देवकवठे ते बोटा असा १०० किलोमीटरचा विस्तीर्ण असणाऱ्या संगमनेर तालुक्यात पठार भाग, प्रवरा पट्टा व तळेगाव भाग असे भौगोलिक दृष्ट्या तीन विभाग येतात. लोकनेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात १७१ गावे व २५८ वाडी वस्तीवर सातत्याने विविध विकासाच्या योजना राबवण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या ३०५४ योजनेअंतर्गत आमदार सत्यजित तांबे यांच्या पाठपुराव्यातून विविध रस्त्यांच्या विकास कामांसाठी २ कोटी रुपयांचा निधी व इतर निधीमधून एक कोटी असे ३ कोटी रुपये रस्त्यांच्या मजबुती करण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे.

**रस्त्यांचे जाळे अधिक मजबूत होणार - आ. तांबे**

**संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा असून माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली या तालुक्यात सातत्याने विकासाच्या योजना राबवल्या गेल्या आहेत. ग्रामीण विकास, शेती, सहकार,शिक्षण,व्यापार अशा सर्व गोष्टींमध्ये संगमनेर तालुका हा राज्यात प्रगतशील असून ग्रामीण भागातील विविध रस्त्यांकरता मिळालेल्या या निधीमधून या रस्त्यांचे मजबुतीकरण होणार असल्याने नागरिकांना दळणवळणाची मोठी सोय होणार आहे. याचबरोबर इतरही तालुक्यांमध्ये शिक्षणाबरोबर विविध विकास कामांसाठी निधी मिळवला असून हे सर्व कामे गुणवत्तापूर्ण होऊन नागरिकांना चांगली सुविधा मिळेल.**

या निधीमधून चिखली ते जवळे कडलग रस्ता इजीमा ३३ मजबुतीकरण करणे कामासाठी ४० लाख रुपये, जवळे बाळेश्वर रस्ता, सारोळे पठार फाटा ते सारोळे पठार गाव इजीमा ३७ रास्ता मजबुतीकरण कामासाठी २० लाख रुपये, शेंडेवाडी, सतीचीवाडी डोळसणे रस्ता मजबुतीकरण कामासाठी २० लाख रुपये, शेडगाव, मालूंजे,रणखांब, कवठे मलकापूर, वरवंडी फाटा ते खांबे रस्ता मजबुतीकरण कामासाठी २० लाख रुपये असे १ कोटी रुपये तर जिल्हा नियोजन समितीच्या ३०५० अंतर्गत खांबा ते खरशिंदे रस्ता मजबुतीकरण कामासाठी १० लाख रुपये, कवठे मलकापूर काळे वस्ती रस्ता मजबुती करण्यासाठी १० लाख रुपये डिग्रस ते हजारवाडी रस्ता मजबुतीकरण करणे १० लाख रुपये, पिंपळगाव कोझिरा ते चोथेमळा रस्ता मजबुतीकरण कामासाठी १० लाख रुपये, वडगाव लांडगा येथील जवळे कडलग, वडगाव लांडगा ते नंदनखिंड रस्ता सुधारणा करणे १० लाख रुपये यासह अनेक गावातील रस्त्यांच्या मजबुतीकरण कामामुळे संगमनेर तालुक्यातील रस्त्यांचे जाळे भक्कम होणार असून ग्रामीण भागातील नागरिकांना दळणवळणाची मोठी सोय होणार आहे.

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रक्कमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
मो : 9372012044
ओम मयूर ज्वेलर्स

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

हॉलमार्क प्रमाणित
AN ISO 9001:2008
GOVT. APPROVED VALUER
PBM Jeweller's
सर्व सोन्याचे दागिने HUID हॉलमार्क प्रमाणित
घटस्थापनेच्या हार्दिक शुभेच्छा
घटस्थापनेच्या सोने खरेदीवर 551/- प्रति ग्रॅम मजुरी
*नियम व अटी लागू.
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
•विश्वास •शुद्धता •विविधता.
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999 | 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅथॉलॉजी मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services